# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दरध्वनी - २२६२०६०४, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०११/ 3000

दिनांक : 27 सितम्बर SEP 2011

प्रति,
संचालक,
ध्येय चॅरिटेबल ट्रस्टचे,
डी.बी.इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट,
ॲण्ड रिसर्च, गट नं. १०,११ व १२,
मौजा- महाळंग्रा, लातूर-नांदेड हायवे,
ता.चाकूर, जि. लातूर

DBIMR MBA
Inword No. 022
Dated 1-12-2011
Sign

**(Institute Code:-2520)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून विना-अनुदान तत्वावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र.सीटीसी -२०११/(१९४/२०११)/तांशि-४ दिनांक २७ जुलै, २०११

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे महाविद्यालय सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने परवानगी दिलेली आहे. परंतू सदरहू आदेश दि. ३० जून २०११ नंतरचे असल्यामुळे सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता शासनाची मान्यता देण्यात आली नव्हती. ही बाब लक्षात घेऊन संस्थेने मा.उच्च न्यायालय, रिट याचिका क्र. ५४०७/२०११ दाखल केली. या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दि. २२.०७.२०११ रोजी संस्थेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता संबंधित विद्यापीठाचे संलग्नीकरण तसेच आवश्यक त्या अटी व शर्तींची पूर्तता करुन नवीन पदव्युत्तर पदवी महाविद्यालय सुरु करण्यास आदेश पारीत केले आहेत. त्या अनुषंगाने आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून खालील अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | एम.बी.ए. | १२० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून एमबीए ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सन २०११-१२ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ, दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते

इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यांत येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

४. संस्थेने एमबीए ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून प्रथम हप्ता **रु. ७.०० लाख** कस्टमर आयडी **क्र.११७४३०११२, दि. २२.०९.२०११ अन्वये बँक ऑफ इंडीया, शाखा- लातूर येथे,** संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. **तसेच द्वितीय वर्षासाठी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी रु. ६.०० लाख संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.**

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व शिक्षण शुल्क समिती, मुंबई, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई, महाराष्ट्र शासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. आपल्या संस्थेची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती बांद्रा यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यांत यावा. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षणशुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणा-या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व कुलसचिव, **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन किंवा **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा कुलसचिव, **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला कुलसचिव, **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी प्रवेश नियमात विहीत केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेश पक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१३. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

१४. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही, तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१५. शासनाने, या संचालनालयाने व कुलसचिव, **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

१६. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा.कुलसचिव, **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी. सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. श्री.एन.बी.पाटील, सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.